NO1990090401

सेवा प्रवेश नियम.

पदोन्नतीसाठी पूर्व अट म्हणून निम्न संवर्गात/सेवेत/श्रेणीत किमान सेवेसंबंधीची अट विहित करणे.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
परिपत्रक क्रमांक- एसआरव्ही-१०८८/१०३/प्र. क्र. १/८८/बारा,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ सप्टेंबर १९९०.

पहा :- [१] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१२७७/१२, दिनांक १४ ऑक्टोबर, १९७७.

[२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१२७७/१२, दिनांक ३ सप्टेंबर १९७९.

[३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८०/१२, दिनांक २० जुलै, १९८१.

[४] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-१०८८/१०९/१२, दिनांक २५ ऑगस्ट, १९८८.

[५] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८८/१०९/१२, दिनांक ३१ मे, १९८९.

प रि प त्र क :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक: एसआरव्ही-१०८८/१०९/बारा, दिनांक २५ ऑगस्ट, १९८८ अन्वये वर्ग ३ पासून वर्ग १ मधील दुसऱ्या पदोन्नतीपर्यन्ताच्या पदांवर पदोन्नती करताना पदोन्नतीसाठी पूर्वअट म्हणून निम्न पदावर किमान ३ वर्षांच्या सेवेची अट विहित करण्यात आलेली आहे. सदर अट अधिक सुस्पष्ट व्हावी व त्यानुसार कार्यवाही करणे सहज शक्य व्हावे म्हणून परोक्त दिनांक २५ ऑगस्ट, १९८८ च्या परिपत्रकातील परिच्छेद क्र. १ मधील ९ व्या ओळीत "करतानाही" आणि "निम्न" या दोन शब्दांच्या मध्ये "निकटतम" हा शब्द अंतर्भूत करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे त्याच परिच्छेदातील "तसेच आंतरश्रेणीय पदोन्नतीसाठी निकटतम निम्न पदावर ३ वर्षांच्या किमान सेवेची अट विहित करण्यात यावी" हे शेवटचे वाक्य वगळण्यात येत आहे.

२. या सुधारणेमुळे आता वर्ग ३ पासून वर्ग १ मधील दुसऱ्या पदोन्नतीपर्यन्तच्या पदांवर आंतरश्रेणी पदोन्नतीसह प्रत्येक टप्प्यावर पदोन्नती करताना निकटतम निम्न पदावर तीन वर्षांच्या किमान सेवेची अट पदोन्नतीसाठीची पूर्वअट म्हणून राहील व प्रत्येक पदोन्नतीसाठी आवश्यक असलेला सदरहू अनुभवाचा कालावधी हा संबंधित सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार नियमित पध्दतीने केलेल्या नियुक्तीनंतरचा असला पाहिजे हे स्पष्ट करण्यात येत आहे.

३. संदर्भांकित दिनांक २५ ऑगस्ट, १९८८ च्या परिपत्रकात स्पष्ट केल्याप्रमाणे मंत्रालयाच्या विविध विभागांनी आपापल्या कक्षेतील पदांच्या संदर्भात वरील तत्व

कृ. मा. प.

संबंधित सेवा प्रवेश नियमांत अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी आणि अशा प्रकारे कार्यवाही पूर्ण होईपर्यन्तच्या कालावधीत पदोन्नती करतांना या तत्त्वाचा अवलंब करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

भा. म. मणगे,
उप सचिव,
महाराष्ट्र शासन.

प्रति,

सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई [पत्राने],
मंत्रालयाचे सर्व विभाग,
मंत्रालयाच्या विविध विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख.

---

क्रमांक एतस्नआर १०९४/२३४२२४/प्र. २५५/ई-६

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- 8 JUN 1994

प्रति,
जमाबंदी आयुक्त व संचालक भूमिअभिलेख,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

10 JUN 1994

विषय :- महाय्यक जिल्हा निरिक्षक भूमि अभिलेख, संवर्गातील पदोन्नती बाबत.

संदर्भ :- आपले क्र. आस्था-१७०/औरंगाबाद/ई-२/१९९४, दिनांक ३/५/१९९४ कृपया पहावे.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन पत्राच्या आपणास असे कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २१ ऑगस्ट १९८९ च्या परिपत्रकानुसार निवडसुची बनविताना किती अधिका-यांचे विचारक्षेत्र असावे या संबंधीच्या सूचना दिलेल्या आहेत. तसेच एखाद्या अधिका-याविरुद्ध विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु झाली असेल अथवा तो निलंबीत असेल आणि ज्येष्ठतेनुसार तो अधिकारी पदोन्नतीच्या विचार क्षेत्रामध्ये येत असेल अशा अधिका-यांच्या बाबतीत पदोन्नती देण्याच्या दृष्टीने सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २/४/१९७६ च्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

संदर्भाधीन पत्रान्वये पाठविलेल्या अधिका-यांच्या नांवापैकी निवड सुचिबनविताना श्री. पी. व्ही. कुलकर्णी या अधिका-याच्या बाबतीत अजूनही शिक्षेचा अंमल पूर्ण झालेला नाही. जोपर्यन्त शिक्षेचा कालावधी पूर्ण होत नाही, तो पर्यन्त सदर अधिका-याचा पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही. त्यामुळे त्यांची पात्रता तपासण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. व्ही. बी. जाधव या अधिका-याच्या बाबतीतही वर नमूद केल्याप्रमाणे विचार होणे आवश्यक आहे, त्यामुळे त्यांचे नाव विभागीय चौकशी निकालाच्या अधिनस्त निवडसूचीमध्ये अंतर्भूत राहिल [मोहोरबंद लिफाफ्यात] मात्र दरम्यानच्या कालावधीमध्ये पदोन्नती द्यावी किंवा कसे याबाबत दोषारोपाचे स्वरुप विचारात घेऊन जाणिवपूर्वक निर्णय घेणे आवश्यक आहे. जर संबंधीताना पदोन्नती न देण्याचा निर्णय झाल्यास त्यांच्या ऐवजी दुस-या अधिका-याला तात्पुरती पदोन्नती देण्याच्या दृष्टीने त्यांचे नाव पदोन्नतीसूची म्हणून वेगळे दाखवावे लागेल. मात्र नियमित स्वरुपाच्या निवडसूचीमध्ये नाव अंतर्भूत करता येणार नाही.

[त्रि. शं. कर्वे]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.